आपली सेवा आमचे कर्तव्य

राज्य लोकसेवा हक्क आयोग
राज्य मुख्य लोकसेवा हक्क आयुक्त कार्यालय,
नविन प्रशासन भवन,७वा मजला,मंत्रालयासमोर —मुंबई -४०० ०३२
ई-मेल :-ccrts@maharashtra.gov.in
दुरध्वनी :- ०२२-२२८३२३४६

---

क्र. संकिर्ण-२०२२/प्र.क्र.५२ /मुसेहआ /कक्ष-१ दिनांक :- २६ ऑगस्ट, २०२२

प्रति,

संचालक,
माहिती व तंत्रज्ञान विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

2618/22

विषय :- शासनाच्या आंतरजाळ (इंट्रानेट) प्रणालीवर जाहिरात प्रसिध्द करणेबाबत.

महोदय,

राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त यांच्या कार्यालयाकरीता गट अ (ग्रेड वेतन रु.७,६००/- पेक्षा कमी) व गट ब (राजपत्रित) या संवर्गातून सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवा करारपध्दतीने विवक्षित कामासाठी आयोगावर नियुक्त करण्याबाबत अर्ज मागविण्याकरीता जाहिरातीचा मसुदा सोबत जोडला आहे. सदर जाहिरात शासनाच्या वेबसाईटवर तातडीने प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

(अभय करगुटकर)
उप सचिव
राज्य मुख्य सेवा हक्क आयोग

**सोबत :-** सहपत्र

O/C

निर्गमित
राज्य लोकसेवा हक्क आयोग
दिनांक - २६/८/२०२२

D:\गवस मॅडम\२०२२\सेवा निवृत्त -अधीकाऱ्यांची नियुक्ती.docx

दिनांक:- २६.०८.२०२२

Application from retired Government Officers in cadre of Group A, Group B (Gazetted)

**महाराष्ट्र राज्य लोकसेवा हक्क आयोग**
**राज्य लोकसेवा हक्क आयुक्त यांचे कार्यालय**
**७ वा मजला, नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर, मुंबई -४०० ०३२.**

शासकीय/ निमशासकीय सेवेतून गट अ (ग्रेड वेतन रु.७,६००/- पेक्षा कमी) व गट ब (राजपत्रित) संवर्गातून सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी/ कर्मचारी यांच्या सेवा करार पध्दतीने मानधन तत्वावर विवक्षित कामासाठी नामिकासूची करण्याकरीता अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | संवर्ग | विवक्षित कामाचे स्वरूप | वय अर्हता व अनुभव |
|---|---|---|---|
| १ | गट अ (ग्रेड वेतन रु.७,६००/- पेक्षा कमी) व गट ब (राजपत्रित) | "महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत अधिसूचित सेवा ऑनलाईन प्रणालीवर प्रभावीपणे राबविणे, आढावा, आपले सरकार पोर्टलचे सुलभीकरण/ सेवांचे संलग्नीकरण, ऑफलाईन व ऑनलाईन अर्जाच्या आकडेवारीचे सांख्यिकी विश्लेषण व संकलन करणे." शासकीय विभागांशी समन्वय व माहितीचे संकलन — विश्लेषण. | गट अ व गट-ब (राजपत्रित) पदावरील कामकाजाचा किमान ३ वर्षाचा अनुभव<br>अर्हता:- पदवीधर, संगणक सांख्यिकी विषयाचे ज्ञान<br>वयोमर्यादा :- ५९ ते ६३ वर्ष, |

**नियुक्तीच्या अटी व शर्ती :-**

१. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. संकीर्ण -२७१५ / प्र.क्र.१००/१३ दिनांक १७.१२.२०१६ अन्वये नियुक्तीच्या अटी व शर्ती विनियमित करण्यात येतील.
२. करारपद्धतीने आयोगामध्ये नियुक्त केलेल्या व्यक्तींना कोणतेही पदनाम असणार नाही.
३. करार तत्वावरील नियुक्त व्यक्तीस अर्जित, नैमित्तीक व वैद्यकीय रजा अनुज्ञेय असणार नाहीत.
४. नियुक्तीच्या कालावधीत विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी करारपद्धतीने नियुक्ती देण्यात आलेल्या व्यक्तीची असेल.
५. करारपद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय/वित्तीय अधिकार नसतील. अशी व्यक्ती कोणत्याही शासकीय पत्र / आदेश यावर स्वाक्षरी करण्यास पात्र असणार नाही.

इच्छूक सेवानिवृत्त अधिकारी/ कर्मचारी यांनी त्यांचे अर्ज आवश्यक त्या शैक्षणिक अर्हता व अनुभवाच्या प्रमाणपत्रासह **हि जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून दि.२६.०९.२०२२ पर्यंत सादर करावेत.**


**संपर्क** :- राज्य मुख्य लोकसेवा हक्क आयुक्त यांचे कार्यालय, ७ वा मजला, नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड, मुंबई- ४०० ०३२

**दूरध्वनी :- ०२२ -२२८३२३४६**

**ई-मेल** :- ccrts@maharashtra.gov.in


(अभय करगुटकर)
उप सचिव
राज्य मुख्य सेवा हक्क आयोग